ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 6 | FEB - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या जिल्हा परिषदव पंचायत समिती यांच्या निवडणुकीचा अभ्यास"




श्री. स. ह. केळकर
महाविद्यालय, देवगड जि. सिंधुदुर्ग
डॉ. संजय भास्कर तायडे (ग्रामीण विकास विभाग)
डॉ.एल. एस. सुरवसे (भौतिक शास्त्र विभाग प्रमुख)

## प्रस्तावना :-

भारतात प्राचीन काळापासून शासन व्यवस्था चालत आलेली आहे. ग्रामीण भागातील जमिनीचा महसूल शेतसारा गोळा करण्यासाठी एक अधिकारी कार्यरत असे. विविध कालखंडात अशा अधिकाऱ्यांना विविध नावाने संबोधले जात होते. मौर्य काळात राजुका गुप्त काळात विसयापती आणि मोगलकाळात अंमलगुजार या नावाने संबोधत. या शासन व्यवस्थेत महिलांना नगण्य स्थान होते.

ग्रामीण सत्तेत महिलांचा सहभाग नव्हता. भारतात १९ व्या शतकात राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, पंडिता रमाबाई, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाजसुधारकांनी महिलांच्या उत्थानासाठी खऱ्या अर्थाने प्रयत्न केले. लॉर्ड रिपनने १८८२ साली पंचायत राज संबंधीचा कायदा केला. २६ जानेवारी १९५० पासून भारत हे सार्वभौम प्रजासत्ताक घोषित करण्यात आले. बलवंतराय मेहता, वसंतराव नाईक समिती, पी.बी.पाटील समिती अशा विविध समित्या पंचायत राजसंबंधी स्थापन करण्यात आल्या होत्या. भारतीय राज्यघटनेच्या अकराव्या व बाराव्या परिशिष्टात समावेश केला आहे. आज आपण २१ व्या शतकात आहोत, भारताचा विचार करता देशाची लोकसंख्या १४० कोटींपर्यंत आहे. या एकूण लोकसंख्येपैकी ७० कोटी लोकसंख्या ही स्त्रियांची आहे. १९९३ च्या ७३ व्या घटनादुरुस्तीने ३३% जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या होत्या. सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे हे मोठे पाऊल होते. २०११ साली स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५०% आरक्षणाची महिलांसाठी तरतूद करण्यात आली. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.

## अभ्यास क्षेत्र :-

प्रस्तुत शोध निबंधाच्या अभ्यासाकरिता अभ्यास क्षेत्र म्हणून संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विचार करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्यात जानेवारी २०२६ मध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका घेण्यात आल्या. यात ५०% महिलांचा सहभाग आहे. जिल्ह्यात आठ तालुके आहेत.

## संशोधनाची उद्दिष्टे :-

१) वर्तमान स्थितीमध्ये पंचायत समिती व जिल्हा परिषदेमध्ये महिलांचा सहभाग किती आहे.

२) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींची संख्या अभ्यासणे.

३) महिलांचा स्थानिक नेतृत्वाचा अभ्यास करणे.

४) कोणत्या राजकीय पक्षाला बहुमत मिळाले याची माहिती घेणे.

## माहिती स्त्रोत व संशोधन पध्दती :-

प्रस्तुत शोध निबंधामध्ये प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीवर आधारित माहिती संकलित केलेली आहे. दुय्यम साधन सामग्रीमध्ये प्रकाशित अहवाल, संदर्भ पुस्तके, विविध लेख, नियतकालिके व दर्जेदार मासिकात प्रसिध्द झालेले लेख, वेब जाळे इत्यादी संदर्भ साहित्याचा वापर केलेला आहे.

## चर्चा व विश्लेषण :-

महाराष्ट्र राज्यात त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था कार्यरत आहे. ग्रामस्तरावर ग्रामपंचायत, तालुका स्तरावर पंचायत समिती, जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद. भारताच्या राज्य घटनाकारांनी सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक परिस्थितीचा विचार करून नागरिकांना हक्क बहाल केले आहेत. जनतेला लोकशाहीचे शिक्षण देण्याकरिता पंचायत राज महत्वाची भूमिका बजावते. ग्रामपंचायत ही खेड्यातील जनतेने चालविलेली प्रारंभिक लोकशाही संस्था होय. महाराष्ट्र राज्यात मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार ग्रामपंचायत कारभार चालविला जातो. जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६२ नुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीचा कारभार चालविला जातो. महाराष्ट्र राज्यात २०११ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ५०% आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाची तरतूद आहे. सरपंच पद, पंचायत समिती सभापती व जिल्हा परिषद अध्यक्ष पद चक्राकार पद्धतीने आरक्षित ठेवले जाते.

भारतातील प्रत्येक नागरिकाला १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर मतदार यादीत नाव नोंदविल्यानंतर मतदानाचा अधिकार दिला आहे.

### जिल्हा परिषदेकरिता निवडणुकीला उभे राहण्यास खालीलप्रमाणे अटी आहे.

१) नागरिकाचे वय २१ वर्ष पूर्ण असले पाहिजे व त्या व्यक्तीचे मतदार यादीत नाव असावे.

२) त्या व्यक्तीकडे कोणतीही थकबाकी नसावी.

३) ती व्यक्ती वेडी नसावी.

### सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेतील आरक्षणाच्या एकूण जागांचा तपशील २०२६

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी महिलांकरिता आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ०३ | ०२ |
| २ | अनुसूचित जमाती | - | - |
| ३ | नागरिकाचा मागास वर्ग | १३ | ०७ |
| ४ | सर्वसाधारण | ३४ | १६ |
| एकूण | | ५० | २५ |

वरील तक्त्यांवरून असे दिसून येते की,

१) अनुसूचित जातींकरीता ३ जागा आरक्षित आहेत. त्यांपैकी दोन जागा महिलांकरिता राखीव आहेत.
२) सिंधुदुर्ग जिल्ह्यात अनुसूचित जमातीची लोकसंख्या अल्प असल्यामुळे त्यांच्याकरीता कोणतीही जागा आरक्षित नाही.
३) नागरिकांचा मागास प्रवर्गाकरिता १३ जागा आरक्षित आहेत त्यांपैकी ७ जागा महिलांसाठी आरक्षित आहेत.
४) सर्वसाधारण जागा ३४ असून त्यांपैकी १६ जागा महिलांकरीता आरक्षित आहेत.

महाराष्ट्र राज्यातील एकूण ३७ जिल्हे आहेत. ३५ जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद आहे. ७ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद निवडणूक घेण्यात आली. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्याची माहिती खालीलप्रमाणे जिल्ह्यात आठ तालुके आहेत.

| अ.क्र. | पंचायत समितीचे नाव | एकूण जागा | शिवसेना उबाठा | भाजप | शिवसेना शिंदे | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कुडाळ | १८ | ५ | ७ | ६ | - |
| २ | दोडामार्ग | ६ | ० | ३ | ३ | ० |
| ३ | वैभववाडी | ६ | ० | ६ | ० | ० |
| ४ | कणकवली | १६ | ० | १५ | १ | ० |
| ५ | मालवण | १२ | ० | ६ | ६ | ० |
| ६ | सावंतवाडी | १८ | १ | ६ | ६ | ५ |
| ७ | वेंगुर्ले | १० | ० | ५ | ४ | १ |
| ८ | देवगड | १४ | १ | १२ | १ | ० |
| | एकूण जागा | १०० | ७ | ६० | २७ | ६ |

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ पंचायत समिती सोडून सर्व पंचायत समितीमध्ये भारतीय जनता पार्टीचे वर्चस्व दिसून येते.

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेत एकूण ५० जागा आहेत.

| अ.क्र. | एकूण जागा | विविध पक्षांना मिळालेल्या जागा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | भाजपा | शिवसेना शिंदे | शिवसेना उबाठा | अपक्ष |
| १ | ५० | २७ | १४ | ३ | ६ |

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, भारतीय जनता पार्टीला सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेत स्पष्ट बहुमत मिळाले आहे.

वरील तक्त्यांवरून खालील निष्कर्ष काढता येतात.

१) ५०% जागा महिलांकरिता राखीव आहेत.
१) कुडाळ पंचायत समिती सोडली तर उर्वरीत ७ पंचायत समित्यांमध्ये भारतीय जनता पार्टीला बहुमत मिळाले आहे.
२) जिल्ह्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीला लोकसंख्येच्या प्रमाणात लोकप्रतिनिधीना संधी मिळाली आहे.

३) भारतीय राज्यघटनेतील दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वात समान संधी देण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे.

४) सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेवर भारतीय जनता पार्टीला स्पष्ट बहुमत मिळालेले दिसून येते.

५) ग्रामीण महिलांना संधी, हक्क, सत्तेत सहभाग वाढला आहे.

६) जिल्हा परिषदेत ८ निवाचण गटात बिनविरोध तर पंचायत समितीच्या १८ जागा बिनविरोध झाल्या.


**वरील शोधनिबंधाकरिता खालील ग्रंथांची मदत झाली आहे :-**

१) मानवी हक्क :- तुकाराम जाधव महेश शिरपूरकर युनिक अॅकेडमी

२) सामान्य क्षमता चाचणी :- डॉ.आनंद पाटील

३) पंचायत राज कार्य कायदा :- मनोज आवळे प्रशांत पब्लिकेशन

४) महाराष्ट्र शासन :- डॉ.वा.भा.पाटील प्रशांत पब्लिकेशन

५) वेबसाईट :- www.maharashtraelectioncommission